**नि. क्र. २७२ च्या आदेशावरुन वादीतर्फे साक्षीदार क्र. ४.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव —** अब्दुलमजीद अहंमद लतीफ.

**वय** - ७६ वर्ष, **व्यवसाय** - बॉड रायटर,

**राहणार**.– रवळनाथ कॉलनी, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे – श्री. एस. आर. पोवार वकील.**

**१.** मला आज साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळालेले आहे. मी मागील ५० वर्षांपासून बॉड रायटरचे काम करत असून माझ्याकडे त्या बाबतचा परवाना आहे. मी वादी व प्रदिप कदम यांना ओळखतो. ते माझ्याकडे दि.१३.०१.२००० रोजी खरेदीपत्र करण्यासाठी साक्षीदारां सोबत आले होते. वादीने प्रदिप कदमला हालेवाडी गावातील जमिनी बाबतचे खरेदीपत्र करुन द्यायचे होते.

२. मी त्यांच्याकडून मिळकतीचा ७/१२ उतारा व माहिती घेतल्यानंतर त्यांना स्टँप आणायला सांगितला होता. मी सांगितल्याप्रमाणे त्यांनी स्टँप आणला होता. त्यावरती मी वादीकडून मिळालेल्या माहिती प्रमाणे खरेदीचा मजकूर लिहिला होता. मी सदर दस्त लिहिल्यानंतर त्यांनी वाचून पाहिला होता. त्यांनी तो बरोबर असल्याचे कबूल केल्यानंतर वादीने स्वाक्षरी केली होती. त्यावरती दोन साक्षीदारांनी सहया केल्या होत्या. मी त्या दस्तावरती दस्तूर म्हणून माझी मराठीमध्ये स्वाक्षरी केली आहे.

३. मला तो मूळ दस्त दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला तो दस्त दाखविला, तो माझ्या हस्ताक्षरात लिहिण्यात आलेला असून त्यावरती दस्तूर म्हणून माझी स्वाक्षरी आहे. मी त्यावरील सर्वांच्या स्वाक्ष–या ओळखतो, त्याला **नि. क्र.२७५** देण्यात येतो. दस्त लिहून झाल्यानंतर त्यांनी तो दुय्यम निबंधक कार्यालयातून नोंदवून घेतला होता.

**सरतपास पुर्ण.**

**वादी तर्फे उलटतपास – श्री. एस. एम. देशपांडे वकील.**

**४.** मी १९७१ साली दस्तलेखनाचा परवाना घेतला होता. मला तो परवाना एक वर्षाकरीता मिळाला होता. त्यानंतर मला त्याचे प्रतिवर्षी नूतनीकरण करुन घ्यायचे होते. मी त्याचे सन २००७ पर्यंत नूतनीकरण केलेले आहे. मी तो आज सोबत आणलेला नाही. हे

म्हणणे खरे नाही की, मी १९८० पासून दस्तलेखनाचे काम करत नाही. सदरचा दस्त वादीने प्रदिप शिवाजीराव कदम याच्या नावे करुन दिला होता. दस्त करतेवेळी प्रदिप कदम हा हालेवाडी गावचा रहिवासी होता. सध्या तो कोल्हापूरला राहतो.

**५.** मला आजरा तालुक्यातील प्रकल्पबाधित आणि लाभार्थी क्षेत्रांचे दस्त करण्यास बंदी असल्याची माहिती होती. मला हालेवाडी गावातील शेतजमिनी आंबेओहोळ प्रकल्पात समाविष्ट असल्या बाबत माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दस्तातील मिळकत हालेवाडी गावातील आंबेओहोळ प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रातील आहे. मला भूसंपादन अधिका–यां मार्फत प्रस्तावित संपादनाच्या गट क्रमांकाची यादी प्रसारीत केली जाते याची माहिती आहे. मी दस्त लिहिण्यापूर्वी आंबेओहोळ प्रकल्पाच्या प्रसारीत यादीची पाहणी केली नव्हती. माझ्याकडे ती यादी नसल्यामुळे मी पाहिली नव्हती.

**६.** दस्तातील आर्थिक व्यवहार माझ्यासमक्ष झालेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दि. १३.०१.२००० रोजी वादी व प्रदिप कदम हे हालेवाडी गावातील जमिनीच्या खरेदी–विक्री चा दस्त लिहिण्यासाठी आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दस्त लिहून झाल्यानंतर वादीने तो वाचून पाहून त्याने व साक्षीदारांनी माझ्या समक्ष स्वाक्ष–या केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नि. क्र.२७५ चा दस्त लिहिलेला नसून तो लिहिला असल्याचे आज खोटे सांगत आहे.

**उलटतपास नाही.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २३.१२.२०२४.
आजरा.

(आर. पी. थोरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.